# शासकीय योजनांच्या माध्यमातून आदिवासी जमातीचा आर्थिक व सामाजिक विकास

**कु. पुनम सयाम**
संशोधक विद्यार्थिनी

---

**प्रस्तावना :**

भारताला स्वतंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक विकासाठी आर्थिक नियोजनाचा मार्ग अवलंबिण्यात आला व १९५१ मध्ये पहिली पंचवार्षिक योजना आखण्यात आली. परंतु सुरवातीच्या ३० वर्षात सरकाराने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकडे पुर्णता दुर्लक्ष केले. पुढे सरकारने आदिवासींकडे विशेष लक्ष पुरविण्यासाठी मंत्रालय पातळीवर १९७३ साली आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली. तत्पूर्वी १९७२ सालापर्यंत आदिवासी कल्याण विभाग हा समाजकल्याण विभागातंर्गत कार्यरत होता. १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली व पुढे १९७३ साली आदिवासी विकास विभाग स्वतंत्र करण्यात आला. परंतु काही काळ समाजकल्याण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली या विभागाचे काम चालू होते. सन १९७५-७६ साली राज्यात आदिवासी उपयोजना लागू करण्यात आली. त्यामुळे विकास कार्याची दिशा राहाता ती विकास बोजना (Welfare Schemes to Development Schemes) अशी करण्यात आली. समुह विकासाचरोचर क्षेत्र विकास असे नियोजनाचे सुत्र ठरविण्यात आले. क्षेत्र विकास कार्यक्रमातुन आदिवासी भागातील साधन संपत्तीचा विकास व संवर्धन होईल व त्याचा फायदा पर्यायाने आजुबाजुच्या आदिवासी समुहांना होईल. आदिवासीचे जीवन ज्या साधनसंपत्तीवर, उदा जमीन, जंगल इ. वर अवलंबून आहे. त्यांच्या विकास कार्यक्रमातुन आदिवासींना संपन्न साथन सामग्रीचा फायदा मिळेल अशा दृष्टीकोनाचा स्विकार करण्यात आला समुह विकासाच्या योजनांचरोबर क्षेत्र विकास कार्यक्रमावर १९७५-७६ पासुन विशेष भर देण्यात आला. यासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणेची गरज होती. त्यासाठी आदिवासी विकास विभाग सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अशा राज्यपातळीवर वेगवेगळ्या कामासाठी प्रशासकीय यंत्रणा उभ्या करण्यात आल्या. त्यातुनच प्रादेशिक व जिल्हा कार्यालये निर्माण झाली व आदिवासी विकासाची स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात आली.

**संशोधन लेखाचा उद्देश :**

सदर संशोधन लेखाचा उद्देश हा आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासात शासकीय योजनांचे काय योगदान आहे? याचा अभ्यास करणे हा आहे.

**महाराष्ट्र शासन व आदिवासी विकास योजना :**

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ.कि.मी. एवढे असुन त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण महाराष्ट्र राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या १६.५ टक्के एवढे आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. त्यात मुखत्वे भिल्ल गोड, महादेव कोळी, पाचरा, ठाकुर, चारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यतः रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंडे (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसुचीत

केलेल्या आहेत. राज्यात एकूण ३५ जिल्हा आहेत. यांत धुळे, नंदुरबार, जळगांव, नाशिक व ठाणे (सह्याद्री प्रदेश) तसेच चंद्रपुर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपुर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पुर्वेकडील वनाच्छादित जिल्हयामध्ये आदिवासींची संख्या अधिक आहेत.

१९७५-७६ या वर्षी भारत सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावातील आदिवासींची संख्या एकूण लोकसंखेच्या ५० टक्क्याहून अधिक असेल त्या गायांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) (Integrate Tribal Development Programme) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले अशा प्रकारचे १६ प्रकल्प होते. नंतर ज्या गावामधील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यापेक्षा किंचितशी कमी होती त्या गावांचा समावेशही अशा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला आणि अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपयोजना (एटीएसपी गट / प्रकल्प) म्हणून ओळखण्यात येऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र आहेत. कालांतराने विखुरलेल्या स्वरुपातील इतर क्षेत्रामधील आदिवासींची संख्या लक्षात घेऊन आणि त्या ठिकाणी चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांचा विचार करुन मुंबई, (आयटीडीपी) (Integrate Tribal Development Programme) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले अशा प्रकारचे १६ प्रकल्प होते. नंतर ज्या गावामधील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यापेक्षा किंचितशी कमी होती त्या गावांचा समावेशही अशा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला आणि अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपयोजना (एटीएसपी गट / प्रकल्प) म्हणून ओळखण्यात येऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र आहेत. कालांतराने विखुरलेल्या स्वरुपातील इतर क्षेत्रामधील आदिवासींची संख्या लक्षात घेऊन आणि त्या ठिकाणी चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांचा विचार करुन मुंबई, औरंगाबाद आणि अकोला यासाठीही प्रकल्प मंजुर करण्यात आले. तसेच जव्हार-मोखाडा क्षेत्रातील आदिवासींची मृत्युची संख्या लक्षात घेऊन तसेच आरोग्य, पोषण आहार आणि सेवायोजनाकडे बारकाईने लक्ष देण्याच्या दृष्टीने ठाणे जिल्हयातील आदिवासी क्षेत्राची २ प्रकल्पाऍवजी ३. प्रकल्यांमध्ये विभागाची करण्यात आली. अशा पध्दतीने सध्या एकूण प्रकल्प अधिका-यांची संख्या २४ आहे.

दरम्यानच्या काळात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रालगतच्या प्रदेशातही काही ठिकाणी आदिवासींची वस्ती असल्याचे सरकारच्या लक्षात आले म्हणून सुमारे १०,००० लोकवस्तीच्या दोनपेक्षा अधिक गावांमध्ये आदिवासींची संख्या ५० टक्क्याहून अधिक असेल तर अशा गावांचा समावेश सुधारीत क्षेत्र विकास खंडामध्ये (म्हाडा) करण्यात याचा असे निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे एकूण ५,००० लोकवस्तीच्या दोन किंवा तीन गावांमध्ये ५० टक्क्याहून अधिक आदिवासींची संख्या असेल तर त्या गावांचा समावेश मिनीमाडा क्षेत्रामध्ये करण्यात यावा अशा सुचना आहेत. महाराष्ट्रामध्ये एकूण ४३ माड़ा क्षेत्रे आणि २४ मिनीमाडा क्षेत्रे आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण आदिवासींपैकी सुमारे ४९ टक्के आदिवासी आयएडीपी, माडा आणि मिनीमाडा क्षेत्रात राहातात व उर्वरीत ५१ टक्के आदिवासी या क्षेत्राबाहेर राहातात. आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्रशासन होण्याच्या दृष्टीने ११९२ मध्ये या विभागाची पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार राज्यात आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे अधिपत्याखाली अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, अमरावती व नागपुर असे चार अपर आयुक्त कार्यालये आहेत. तसेच २४ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये कार्यरत असुन त्यापैकी ११

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अत्यंत संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यामध्ये नाशिक, कळवण, तळोदा, जव्हार, डहणू, धारणी, किनवट, पांढरकवडा, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे

**आर्थिक उन्नतीच्या योजना :**

**आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप :**

आदिवासी शेतकऱ्यांना त्यांचा शेतीविकास किफायतशीरपणे होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या साधनांचा व ऊर्जेचा पुरेपूर उपयोग करून त्याद्वारे जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणून आदिवासींचा आर्थिक विकास साधण्याच्या हेतूने १०० टक्के अनुदानावर वीजपंप / तेलपंप पुरविण्यात येत आहे.या योजनेत सर्वसाधारणपणे ३ व ५ अश्वशक्तीचे वीजपंप / तेलपंप मंजूर करण्यात येतात.

**केंद्रीय अर्थसंकल्प :**

ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरूपाच्या स्थानिक महत्वाच्या कर्जविरहित योजना तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करून गरजू आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. आदिवासी व्यक्ती / कुटूंब केंद्रबिंदू मानून या योजनेअंतर्गत कर्ज देणे अपेक्षित नाही.

१. योजनेतंर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस / कुटुंबास / सामूहिक प्रकल्प / कार्यक्रमातंर्गत आर्थिक मर्यादा रु. १५,०००/- पर्यंत.

२. ४ गट नमूद केले आहेत.

1. उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना
2. प्रशिक्षणाच्या योजना
3. मानवी साधनसंपत्तीच्या योजना
4. आदिवासी कल्याणात्मक योजना

३. अ या गटात अनुदानाची मर्यादा खालीलप्रमाणे

1. सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी - ८५ टक्के व १५ टक्के वैयक्तिक सहभाग
2. आदिम जमाती लाभार्थी - ९५ टक्के व ५ टक्के वैयक्तिक सहभाग
3. जेथे अर्थसहाय्य रु. २००० असेल तेथे १०० टक्के अर्थसहाय्य

**व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना (केंद्रपुरस्कृत योजना) :**

आदिवासी युवकांकरिता स्थानिक गरजांवर आधारित लहान लहान प्रशिक्षण सभ्यासक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगाराची संधी देणे, तसेच आदिवासी भागातील लोकांना अत्यंत गरजेची यंत्रे व अवजारे स्थानिकरीत्या दुरुस्त करून घेण्याच्या दृष्टीने कुशल कारागीर उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.हि व्यवसाय प्रशिक्षण केंद्र ४ निवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळेमध्ये सुरु करण्यात आली आहेत. या इलेक्ट्रिशिअन, ऑईल इंजिन / इलेक्ट्रिक मोटार दुरुस्ती, मोटार मॅकॅनिक इ. अभ्यासक्रम शिकविले जातात. प्रशिक्षणाचा कालावधी ४ महिन्याचा असतो. एका सत्रात ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. प्रशिक्षणार्थींच्या इच्छेनुसार ३ प्रकारच्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण त्यांना घेता येते.

**स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना** :

Research Hub International Journal

आदिवासी बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने स्वतःचे विविध व्यवसाय सुरु करण्याकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. हि योजना एन.एस.सी.एफ.डी.सी., नवी दिल्ली या राष्ट्रीय स्तरावरील वित्तीय संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येते.या योजनेंतर्गत एन.एस.सी.एफ.डी.सी. व शबरी महामंडळ यांचेकडून २.५० लक्ष रुपयांच्या गुंतवणुकीच्या व्यवसायाकरिता लाभार्थ्याने ५ टक्के स्वभाग ९५ टक्के कर्ज व २.५० लक्ष रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीच्या व्यवसायाकरिता लाभार्थ्याने १० टक्के स्वभाग भरल्यास ९० टक्के कर्ज उपलबध करून देण्यात येते. या कर्जावर रु. ५.०० लक्ष पर्यंत दरसाल दर शेकडा ७ टक्के व्याज व त्यापेक्षा जास्त कर्ज रकमेवर दरसाल दरशेकडा ९ टक्के व्याज आकारण्यात येते.या योजनेंतर्गत वाहन खरेदी, शेळी पालन, जनरल स्टोअर्स अशा जवळपास १२८ प्रकारच्या व्यवसायांपैकी वेळोवेळी दरवर्षी एन.एस.सी.एफ.डी.सी. ने मंजूर केलेल्या व्यवसायांना कर्ज पुरवठा करण्यात येतो.

**आदिम जमातीसाठी विकासाच्या योजना :**

अनुसूचित क्षेत्रात दुर्गमतेमुळे पुरेश्या प्रमाणात सुविधा उपलब्ध नाहीत अशा क्षेत्रातील अतिमागास व दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या आदिम जमातीच्या शेतकऱ्यांसाठी त्यांना सुधारित शेतीची गोडी निर्माण व्हावी. शेतीत सुधारणा व्हावी, पर्यायाने त्यांचा विकास व्हावा व त्यांची आर्थिक स्थिती सुधारावी व त्यांना मुख्य प्रवाहात सामील होता यावे या उद्देशाने वाडी विकास कार्यक्रम योजना शासनाने पेण व पांढरवडा या प्रकल्प क्षेत्रांतर्गत आदिम जमातींच्या लोकांसाठी आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आदिम-२२०३/प्र.क्र ८५/का.१७, दिनांक १९.८.२००३ अन्वये मंजूर करण्यात आली आहे. सदरची योजना महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ओफ टेक्नॉलॉजी ट्रान्सफ रूरल एरियाज (मित्रा), नाशिक या संस्थेमार्फत राबविण्यात येत असून या योजनेमार्फत स्वयंरोजगार निर्माण करणे, जमिनीच्या उत्पादन क्षमतेत वाढ, शेतीच्या उत्पादनात वाढ, कुटुंबांच्या स्थलांतरामध्ये घट, आरोग्य व राहणीमान यात सुधारणा करणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत.

**मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना :**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहनचाक संदर्भातील रिक्त पदांचा अनुशेष भरून निघावा व पर्यायाने अनुसूचित जमातींच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांढरवडा व गडचिरोली येथे प्रशिक्षण सुरु केले.मोटार वाहन प्रशिक्षण स्तराचा कालावधी प्रथम सत्र एप्रीत ते सप्टेंबर व व्दितीय सत्र ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत प्रशिक्षणार्थी तांत्रिक व अतांत्रिक चालक विषयक बाबीवर सखोल प्रशिक्षण देण्यात येते. तसेच प्रशिक्षणार्थ्यांकडून वाहन चालकांचे प्रशिक्षण देऊन सराव करण्यात येतो.

**सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण योजना :**

राज्यात अनुसूचित जमातीच्या युवकांना राज्य पोलीस दल लष्कर तथा तत्सम विविध सुरक्षा दलातील अनुशेषांतर्गत संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यात एकूण ९ ठिकाणी पोलीस तथा सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. शारीरिक व शैक्षणिक दृष्ट्या योग्य असणाऱ्या आदिवासी तरुण / तरुणींना त्यांची कुटुंबांची आर्थिक व सामाजिक प्रगती होईल व त्यांचे जीवनमान उंचावेल म्हणून सैन्य दल किंवा पोलीस दलात भरती होणयासाठी भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येते.आदिवासी प्रशिक्षणार्थींना जेवण, राहणे, गणवेश, खेळांचे साहित्य, बूट-मोजे, अंथरून-पांघरून इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातात.

**खावटी कर्ज योजना :**

महाराष्ट्र राज्य आदिवासींची आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियम, १९७३ चे तरतुदीनुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विशिष्ठ घटकांकडून आदिवासी बांधवांची होणारी परंपरागत होणारी पिडवणूक व शोषण थांबवण्याकरिता व ऐन पावसाळ्यात उपासमार होऊ नये म्हणून शेत मजूर व अल्प भूधारकांच्या ४ युनिट पर्यंतच्या कुटुंबांना प्रत्यकी रु.२०००/-, ८ युनिट पर्यंतच्या कुटूंबाना प्रयत्यकी रु.३०००/-, व त्यावरील कुटुंबांना प्रत्यकी रु.४०००/- अशा सुधारित दराने खावटी कर्ज वाटप करण्यात येते. यामध्ये ९० टक्के धान्य रूपाने व १० टक्के रोख स्वरूपात लाभ देण्यात येतो.

**धान्यकोष योजना :**

शासनाद्वारे राबविण्यात येत असलेल्या खावटी कर्ज योजनेला पर्याय म्हणून धान्यकोष योजना १९९५ पासून सुरु करण्यात आली आहे. खावटी कर्ज योजना वसुली होत नसल्याने शासनावर पडत असलेला बोजा कमी होऊन शासनाची आर्थिक बचत व्हावी व धान्यकोष योजनाद्वारे आदिवासी भागातील गावकऱ्यांमध्ये अन्नधान्याच्या संदर्भात आत्मनिर्भरता निर्माण व्हावी हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात ३-४ गावांच्या समूहकरीता (५० ते ५०० कुटुंबे) परिसरातील सेवाभावी संस्था / सहकारी संस्था / ग्रामपंचायत यांच्या मदतीने नाममात्र रु.५ ते १० प्रवेश शुल्क घेऊन (आदिवासी व इतर सर्वांकरिता) धान्यकोष स्थापन करणे व त्याद्वारे कुटुंबाना आवश्यक तेव्हा गरजेनुसार धान्य उपलब्ध करून देणे आणि १०५ ते ११५ टक्के पर्यंत हंगामानंतर धान्य रूपाने / रोखीने फेड करणे व चक्र सुरु ठेवणे असे या योजनेचे स्वरूप आहे. धान्यकोषचे सभासद असलेले भूधारक कुटुंब ५० ते १०० किलो (१/३ हिस्सा) धान्य रूपाने व भूमिहीन कुटुंब रोखीने वर्गणी देऊ शकते. आदिवासी सभासदांच्या जमा धान्यसाठ्याच्या २/३ हिस्सा शासनाद्वारे आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून देण्यात येतो. धान्य साठवणुकीच्या व्यवस्थेकरिता व तराजू, काटे इत्यादींकरिता रु. ३०००/- चे अर्थसहाय्य देण्यात येते.

**आदिवासी विकासाचा दृष्टीकोन** :

आदिवासींच्या समस्यांचा आढावा घेऊन त्यावर उपाय करणे आव्हानात्मक आणि वेळखाऊ दोन्ही आहे . परंतु, अंतर्गत आणि बाह्य एजन्सींकडून विकासात्मक बदलासाठी लक्ष्यित केलेला दृष्टीकोन उद्दिष्ट आणि अपेक्षित आहे. परिस्थिती सुधारण्यासाठी अंतर्गत इच्छाशक्ती आणि प्रेरणा असली पाहिजे आणि दुसरे म्हणजे "विना बदल" किंवा "बाह्य समर्थनासह बदल" हे सरकार आणि गैर-सरकारी संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर अपेक्षित आहे. दुस-या बाबतीत, इनपुट्स मुख्यतः पंचवार्षिक योजनांच्या स्वरूपात असतात, ज्याचे काही ठळक मुद्दे आहेत:

- पहिली पंचवार्षिक योजनेत (1951-56), समुदाय विकास कार्यक्रम लोकांच्या सहभागावर आणि अनुकूल प्रेरणेवर केंद्रित होते ज्यात त्यांच्या संस्कृतीसाठी गैर-आक्रमक असलेल्या आणि त्यांचे जीवन सुधारू शकतील अशा नवकल्पनांच्या प्रसाराच्या प्रक्रियेद्वारे बदल अपेक्षित होते.
- दुसरी पंचवार्षिक योजनेत (1956-61), 43 विशेष बहुउद्देशीय आदिवासी गट (SMPTBs) (पुढे आदिवासी विकास ब्लॉक- TDBs म्हणून ओळखले गेले ) तयार करण्यात आले.
- तिसरी पंचवार्षिक योजना (1961-66), अन्न उत्पादन आणि वैयक्तिक शेत-पीक उत्पादन योजना (FCPP) वर केंद्रित आहे. व्हेरिअर एल्विन यांच्या अध्यक्षतेखाली, SMPTB चे पुनरावलोकन करण्यात आले आणि त्यांना आदिवासी विकास ब्लॉक्स (TDBs) असे नाव देण्यात आले. ज्या भागात ६०% पेक्षा जास्त लोकसंख्या आदिवासींची आहे अशा सर्व भागात ते उघडण्याची सूचना केली होती.

- चौथ्या पंचवार्षिक योजनेत (1969-74), प्राधान्यक्रम जवळजवळ अपरिवर्तित होते परंतु कुपोषणापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी आदिवासी अर्भकांच्या पूरक पोषण आहाराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी क्रॅश स्पेशल न्यूट्रिशन प्रोग्राम आणि क्रॅश एम्प्लॉयमेंट प्रोग्राम सारखे विशेष कार्यक्रम राबविण्यात आले. . त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच स्मॉल फार्मर्स डेव्हलपमेंट एजन्सीज (SFDAs) आणि सीमांत शेतकरी आणि कृषी मजूर विकास एजन्सीज (MFALs) सारख्या कार्यक्रमांची मालिका कल्पित करण्यात आली होती ज्यात पात्रता असलेल्या निवडक व्यक्तींच्या विकासाकडे लक्ष क्षेत्र विकासाकडे वळवले गेले . SFDAs च्या धर्तीवर , आदिवासी समस्यांना लक्ष्य करणाऱ्या आदिवासी विकास एजन्सी (TDAs) ची स्थापना करण्यात आली.
- पाचवी पंचवार्षिक योजनेत (1974-79), एकात्मिक क्षेत्र विकास दृष्टीकोन वापरण्यात आला ज्यामध्ये आदिवासी उप-योजना योजनेद्वारे प्रकल्पांना अंतिम रूप देण्यासाठी लोकसंख्येचे प्रमाण, पर्यावरण आणि संसाधने, आदिवासींची जीवनशैली आणि संस्कृती या बाबींना महत्त्व देण्यात आले . आदिवासी आणि इतर भागातील विकासात्मक उपक्रमांमधील अंतर कमी करणे हा त्याचा उद्देश होता. तसेच, योग्य गुंतवणुकीसाठी आणि समान वाढीची प्रेरणा निर्माण करण्यासाठी वाढ केंद्रे निवडली गेली.
- सहाव्या पंचवार्षिक योजनेत (1980-85), MADA (सुधारित क्षेत्र विकास दृष्टीकोन ) लहान भागातील आदिवासी लोकसंख्येचा समावेश करण्यासाठी अवलंब करण्यात आला.

त्याचप्रमाणे आपण बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात आहोत, जिथे आदिवासींच्या विकासासाठी अजूनही विविध धोरणे आखली जात आहेत.

**सारांश :**

- भारतातील जमाती एकूण भारतीय लोकसंख्येच्या सुमारे 8.6% आहेत (जनगणना, 2011), प्रत्येक जमाती सामाजिक-संस्कृती-आर्थिक पार्श्वभूमीत इतरांपेक्षा वेगळी आहे.
- भारतीय जमातींच्या प्रमुख समस्या शिक्षण, आरोग्य, उपजीविका आणि संस्कृती या क्षेत्रातील आहेत .
- आदिवासी विकास कार्यक्रम आणि कल्याणकारी योजनांचा इतिहास दोन टप्प्यांत अभ्यासला जाऊ शकतो: स्वातंत्र्यपूर्व टप्पा आणि स्वातंत्र्योत्तर टप्पा.
- स्वातंत्र्यपूर्व काळात, आदिवासींबद्दलचा ब्रिटिशांचा दृष्टीकोन सुधारक आणि अलगाववादी अशा दोन्ही स्वरूपाचा होता ज्याने आदिवासींना मुख्य प्रवाहातील लोकसंख्या आणि विकासापासून दूर ठेवण्यावर लक्ष केंद्रित केले होते, जोपर्यंत काही आदिवासी भागात सक्रिय ख्रिश्चन मिशनऱ्यांद्वारे ओळख होत नाही.
- स्वातंत्र्योत्तर दृष्टिकोन, राज्य, केंद्र आणि लोकांच्या सहभागाने आदिवासी समुदायांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी कार्य करणारी वाढ-उन्मुख धोरण स्वीकारली .
- आदिवासींच्या विकासाचा दृष्टीकोन त्यांच्या जंगले, जमीन आणि संसाधनांशी असलेल्या त्यांच्या नातेसंबंधाची समज आणि प्रशंसा यावर आधारित आदिवासी-समावेशक असावा . त्यात भौगोलिक संलग्नता, सामायिक संसाधन क्षमता, विकासाची व्यवहार्य एकके, सामान्य गरजा आणि इतिहास यांच्या आधारे आदिवासी प्रदेशांचे विभाजन करणे, तसेच त्यांच्या जमिनी आणि पुनर्स्थापनाबाबत निर्णय घेण्यामध्ये त्यांच्या सहभागास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. दर्जेदार शिक्षण आणि प्रशिक्षण देणे हे त्यांच्या वाढीसाठी आणि क्षमतांच्या प्राप्तीसाठी महत्त्वाचे आहे. इतर पध्दतींमध्ये हे समाविष्ट आहे: निर्वाह

विकास, निधीचे चॅनेलायझेशन, इष्टतम पद्धतीचा वापर इ.

- भारताचे पहिले पंतप्रधान पं.च्या क्रांतिकारी शब्दापासून सुरुवात करून. जवाहरलाल नेहरू, भारतातील आदिवासींच्या विकासाबाबत, आपण सरकारी खात्यांकडून अनेक सुधारणा आणि पुनरावलोकने पाहिली आहेत. यापैकी काही प्रयत्नांमध्ये हे समाविष्ट आहे: 6 व्या अनुसूची अंतर्गत अनुसूचित जातींसाठी लाभ, भारतीय राज्यघटनेच्या कलम 332 , 1999 मध्ये नोडल आदिवासी व्यवहार मंत्रालयाची स्थापना, आदिवासी उपयोजना (TSPs), एकात्मिक आदिवासी विकास संस्था (ITDA) ची मान्यता )/ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (ITDP), आदिवासी संशोधन संस्था (TRIs), सूक्ष्म-प्रकल्प एजन्सी (MPA), उच्चस्तरीय समित्या (HLCs), राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग (NCST), प्रकल्प मूल्यांकन समित्या (PACs), राष्ट्रीय वन धोरण, 1988 इ.

**संदर्भसूची :**


- फडके, सुधीर, (1963), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे; जोषी आणि लोखंडे प्रकाशन, पुष्ट क्रं. 19,103.
- नाडगोंडे, गुरूनाथ, (2004 तृतीय आवृत्ती), भारतीय आदिवासी, पुणे; कॉन्टिनेन्टल प्रकाषन. पुष्ट क्र. 1
- गारे, गोविंद, (2009), आदिवासींचे शिक्षण, औरंगाबाद; साकेत प्रकाशन प्रा.लि. पुष्ट क्र. 20-23.
- क-हाडे, बाबू, (2004), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नागपुर; मानवता सांस्कृतिक विकास व शोध केंद्र चामोर्शी, हिंद मुद्रणालय महाल, पुष्ट क्रं. 4.
- आकरे, बी. एन.,(2009), आदिवासी जिवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम, नागपूर पिंपळापुरे बुक डिस्टीबुटर्स पुष्ट क्रं. 3.
- वार्षिक अहवाल 2014-15. आदिवासी कल्याण आणि विकास. नवी दिल्ली, आदिवासी व्यवहार मंत्रालय, 2015.http://tribal.nic.in/WriteReadData/CMS/Documents/201504291141421695180वार्षिक अहवाल2014-15.pdf (1 जुलै 2015 रोजी ऍक्सेस)
- http://tribal.nic.in/Content/DefinitionATDevelopment.aspx (15 जुलै 2015 रोजी ऍक्सेस)


Research Hub International Journal